MHAH230007302024

**दादा सोनबा खलाटे**
**वि.**
**श्रीयश शरद काळे**

# <u>नियमीत दिवाणी दावा क्र. २९६/२०२४ मधील निशाणी क्र. ३४ खालील आदेश</u>

१. सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे. वादी यांचे कथन की, दावा टंकलिखीत करीत असताना दावा कलम १ अ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या वर्णनामध्ये गट नं. ३७२(जुना गट नं. २९५) पैकी पश्चीम कडीलचे "क्षेत्र या कॉलम मध्ये १.९३ पोटखराबा ०.०५ एकुण १.९८" असे लिहीले जाणे उपस्थित होते परंतू टंकलेखकाच्या चुकीने सदर वर्णन, "१.७४ पोटखराबा ०.०५ एकुण १.७९" असे टंकलिखीत केले गेले आहे.

२. वादी यांचे कथन की, सदरची चुक ही टंकलेखनाची आहे. व अनावधानाने झालेली आहे. त्या दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणतेही बदल होत नाही. त्यामुळे दावा दुरुस्ती करण्याची परवानगी वादी यांना देण्यात यावी अशी विनंती केली.

३. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले आहे व नमुद केलेले आहे की, वादी यांनी दिलेला अर्ज व त्यातील मजकूरावरुन क्षेत्र हे १.९३ कसे व पोटखराबा ०.०५ आर कसे यांचा बोध होत नाही. त्यामुळे दुरुस्ती कारण स्वयंस्पष्ट नाही. सदरची मुळ दाव्यातील चुक टंकलेखनाने होणे शक्य नाही. त्यामुळे अर्ज

फेटाळण्यात यावा. अथवा न्यायालयाचे मत अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास रक्कम रुपये १०,०००/– कॉस्ट चा आदेश करावा अशी विनंती केली.

४. मी वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांच्या विरुध्द निरंतर ताकीदीच्या हुकूमा करीता दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये अद्याप मुद्दे उपस्थित झालेले नाही. वादींनी कथन केल्याप्रमाणे प्रथमदर्शनी अर्जात नमुद टंकलेखनाची चुक दिसुन येत आहे व सदर टंकलेखनाची दुरुस्ती करण्याची परवानगी दिल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही तसेच दाव्याच्या मुळे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सबब, खालील आदेश.

## आदेश

१. वादी यांचा निशाणी ३४ वरील आदेश मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी आदेशापासून १४ दिवसांच्या आतमध्ये दावा दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत दाखल करावयाची आहे.

RAVINDRA BHAGVAN KHAWALE

Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2026.01.19 11:35:00 +0500

**दिनांक** – १९.०१.२०२६
**ठिकाण** – श्रीगोंदा

रविंद्र भ. खवले,
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**श्रीगोंदा**